मूल्य पाच रुपये

Reg. No. RNP/NP CITY/236/09-11
Without Prepayment of Postage
No. RNP/NP CITY/WPP/28/09-11

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## प्राधिकृत प्रकाशन

नं. ३३] गुरुवार, दिनांक ३० सप्टेंबर २०१० / आश्विन ८, शके १९३२

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी प्रत्येक विभागाच्या पुरवणीला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग एक-अ—नागपूर विभागीय पुरवणी

(भाग चार-ब मध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त) केवळ नागपूर विभागाशी संबंधित असलेले महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपालिका बरो, जिल्हा नगरपालिका, प्राथमिक शिक्षण व स्थानिक निधी लेखापरिक्षा अधिनियम या अन्वये काढण्यात आलेले आदेश व अधिसूचना.

भाग १-अ (ना. वि. पु.), म. शा. रा., अ. क्र. १७९.

### नगर विकास विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ८ सप्टेंबर, २०१०.

**नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८.**

क्र. नामपा-२३०८-प्र.क्र.३५८-नवि-२६.—

नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८ (सन १९५० चा मध्यप्रांत व वऱ्हाड अधिनियम क्रमांक २) याच्या कलम ४१८ च्या पोट-कलम (१) अन्वये प्रदान केलेल्या अधिकारानुसार महाराष्ट्र शासन, नागपूर महानगरपालिकेने उक्त अधिनियमाच्या कलम ४१५ व कलम २०१ अन्वये नागपूर शहर महानगरपालिका पाणीपट्टी दर, मुल्यांकन आणि वसुली उपविधि, २००९ मध्ये केलेल्या पुढील सुधारणांना ज्यांना उक्त अधिनियमाच्या कलम ४१७ अन्वये आवश्यक ती पूर्व प्रसिद्धी देण्यात आली आहे असे उपविधि योग्य त्या फेरबदलासह याद्वारे कायम करीत आहे.

(अ.) या उपविधींना नागपूर शहर महानगरपालिका पाणीपट्टी दर, मुल्यांकन आणि वसूली (दुरुस्ती) उपविधि, २०१० असे म्हणावे.

(ब.) नागपूर शहर महानगरपालिका पाणीपट्टी दर, मुल्यांकन आणि वसूली उपविधी, २००९ (यापुढे यास " मुख्य उपविधी " असे संबोधण्यात यावे) मधील खालील उपविधि जोडण्यात/बदलण्यात आले आहेत.

१. उपविधि क्र. २ (म).—' एक युनिट ' पाणीवापर म्हणजे एक हजार लिटर पाणीवापर.

२. उपविधि क्र. ६ (अ).—

जलप्रदाय विभाग, महानगरपालिका, नागपूरकडून करण्यात आलेल्या पाणीपुरवठ्याची आकारणी वर्गवारीनिहाय प्रति नळ जोडणी प्रति निवासी गाळा प्रति माह ग्राहकाने वापरलेल्या/मीटरने मोजलेल्या परिमाणानुसार करण्यात येईल.

३. **उपविधि क्र. ६ (क).––**

नागपूर महानगरपालिकेच्या निश्चित धोरणानुसार स्लम क्षेत्रातील प्रत्येक घरात निवासी वापराकरिता १५ मि. मि. व्यासाचे मीटरसह नळजोडणीद्वारे पाणीपुरवठा करण्यात येईल. या अंतर्गत स्लम क्षेत्रातील फक्त झोपड्या (कॉंक्रीटचे छत नसलेले घर) व ५०० वर्गफूट पर्यंत पक्के बांधकाम असलेल्या घरांचाच समावेश राहील.

मात्र स्लम क्षेत्रातील वर नमुद घरांत अस्तित्वात असलेली १५ मि. मि. व्यासाची अनधिकृत नळजोडणी आणि नळजोडणी नसलेल्या घरात निवासी वापराकरिता १५ मि. मि. व्यासाचे नवीन नळजोडणी मीटरसह जोडपत्र 'अ' मध्ये दिलेल्या उपविधि ६ दर कलम ६ (क) मधील दरान्वये क्रमशः नियमितीकरण/नवीन नळजोडणी शुल्क घेऊन अधिकृत करण्यात येईल/मंजूर करण्यात येईल.

मात्र ५०० वर्गफूट पेक्षा जास्त पक्के बांधकाम असलेल्या घरांतील अनधिकृत नळजोडण्याना उपविधि क्रमांक २९ अ मधील तरतूद आणि नवीन नळजोडणी करिता नवीन नळजोडणीची प्रचलित तरतूद लागू राहील.

४. **उपविधि क्र. ६ (ड).––**

स्लम क्षेत्रातील फक्त झोपड्या (कॉंक्रीटचे छत नसलेले घर) व ५०० वर्गफूटपर्यंत पक्के बांधकाम असलेल्या घरांत मीटरद्वारे व विनामीटर निवासी वापराकरिता अधिकृतरित्या पाणीपुरवठा प्राप्त करणाऱ्या १५ मि. मि. व्यासाच्या नळजोडणीकरिता जोडपत्र ' अ ' मध्ये दिलेल्या उपविधि ६ दर कलम ६ (ड) मधील दरान्वये पाणीपट्टी आकारण्यात येईल.

मात्र स्लम क्षेत्रातील वर नमूद घरांतील अनिवासी वापराकरिता आणि झोपड्या (कॉंक्रीटचे छत नसलेले घर) व ५०० वर्गफूट पर्यंत पक्के बांधकाम असलेल्या घरांव्यतिरिक्त इतर घरांतील पाणीपुरवठ्याला उपविधि ९ (अ), (ड), (इ) मधिल संबंधित वर्गवारीनुसार पाणीपट्टी आकारण्यात येईल. तसेच पाणीवापर सुरक्षा अनामत रक्कम उपविधि १० (ड) मधील संबंधीत वर्गवारीनुसार आकारण्यात येईल.

५. **उपविधि क्र. ६ (इ).––**

ज्या इमारतीत/भूखंडावर/जमिनीवर महानगरपालिकेच्या पाईप लाईनद्वारे पाणीपुरवठा होत नाही त्या इमारतीत/भूखंडावर/जमिनीवर वार्षिक भाडे मुल्यधारित पाणीपट्टी आम पाणीकर म्हणून मालमत्ता करात जोडपत्र ' अ ' मध्ये दिलेल्या उपविधि ६ दर कलम ६ (इ) मधील दरान्वये आकारण्यात येईल.

६. **उपविधि क्र. ८ (अ).––**

मीटर सुरक्षिततेसाठी ग्राहक जबाबदार राहील आणि ते चोरीला गेल्यास, आग किंवा अपघात किंवा अन्य तऱ्हेने बिघडल्यास/तुटफुट झाल्यास त्यास ग्राहक सर्वस्वी जबाबदार राहील व अशा प्रकरणात ग्राहकास स्वखर्चाने नविन मीटर लावावे लागेल.

७. **उपविधि क्र. ९ (अ) निवासी.––**

मीटरद्वारे घरगुती वापरासाठी पाणीपुरवठा प्राप्त करणारी घरे, सहनिवासी इमारती व वसाहतीतील गाळ्यांना जोडपत्र ' अ ' मध्ये दिलेल्या उपविधि ९ दर कलम ९ (अ) मधील दरान्वये पाणीपट्टी आकारण्यात येईल. याव्यतिरिक्त महानगरपालिकेने पुरविलेल्या मीटरकरिता प्रचलित दरावर मीटर भाडे आकारण्यात येईल.

१ गाळा = १ फ्लॅट = १ कुटुंब = वसाहतीतील १ घर.

८. **उपविधि क्र. ९ (ब).–– अर्धनिवासी** : रद्द करण्यात आले.

९. **उपविधि क्र. ९ (क).––संस्थेकरिता.**

(i) **उपविधि क्र. ९ (क-१) संस्था-अ :** मीटरद्वारे पाणीपुरवठा प्राप्त करणाऱ्या शासकीय/अर्धशासकीय संस्थेच्या निवासी इमारती/वसाहतीतील गाळे, खाजगी लहान दूध डेअरी, धार्मिक स्थळे, हॉस्टेल/वसतीगृह, सर्कस, संगणक प्रशिक्षण केंद्र इत्यादिंकरिता जोडपत्र ' अ ' मध्ये दिलेल्या उपविधि ९ दर कलम ९ (क-१) मधील दरान्वये पाणीपट्टी आकारण्यात येईल. याव्यतिरिक्त महानगरपालिकेने पुरविलेल्या मीटरकरिता प्रचलित दरावर मीटर भाडे आकारण्यात येईल.

(ii) **उपविधि क्र. ९ (क-२) संस्था-ब :** मीटरद्वारे पाणीपुरवठा प्राप्त करणाऱ्या धर्मदाय आयुक्तांकडे पंजिबद्ध संस्थेचे दवाखाने/महाविद्यालये/शाळा, खाजगी शाळा/महाविद्यालये, बॅंक, खाजगी कार्यालये, शासकीय रूग्णालये, शासकीय अनुदान प्राप्त अनुसंधान केंद्र, रेल्वे कार्यालय, रेल्वे वर्कशॉप, रेल्वे स्टेशन, विमानतळ, औषधांचे कारखाने, बस स्थानक, बस डेपो/वर्कशॉप, डिफेन्स कार्यालये व त्यांच्या वसाहती, शासकीय/अर्धशासकीय परिसर किंवा शासकीय/अर्धशासकीय परीसरासह जोडलेल्या वसाहती तसेच उपविधि ९ (अ), (क-१), (ड-१), (ड-२), (इ), (फ) आणि (ग) मध्ये न-मोडणाऱ्या वर्गवारींकरिता जोडपत्र अ मध्ये दिलेल्या उपविधि ९ दरकलम ९ (क-२) मधील दरान्वये पाणीपट्टी आकारण्यात येईल. याव्यतिरिक्त महानगरपालिकेने पुरविलेल्या मीटरकरिता प्रचलित दरावर मीटर भाडे आकारण्यात येईल.

१०. **उपविधि क्र. ९ (ड).––व्यापारिक १ :**

(i) **उपविधि क्र. ९ (ड-१).––व्यापारिक १-अ** : मीटरद्वारे पाणीपुरवठा प्राप्त करणारे खाजगी खाटांचे दवाखाने (बेडेड हॉस्पीटल), मंगल कार्यालये, लॉन, सभागृह, बी व सी क्लास लॉज/हॉटेल/रेस्टॉरेंट इत्यादिकरिता जोडपत्र ' अ ' मध्ये दिलेल्या उपविधि ९ दरकलम ९ (ड-१) मधील दरान्वये पाणीपट्टी आकारण्यात येईल. या व्यतिरिक्त महानगरपालिकेने पुरविलेल्या मीटरकरिता प्रचलित दरांवर मीटरभाडे आकारण्यात येईल.

(ii) उपविधि क्र. ९ (ड-२).––व्यापारिक १-ब : मीटरद्वारे पाणीपुरवठा प्राप्त करणारे पेट्रोलपंप, पोहण्याचे टाके, क्लब, क्लास ए हॉटेल्स, गाड्या धुण्याचे सर्व्हीस सेंटर, शासकीय दुग्धयोजना, खाजगी मोठ्या दुग्धयोजना, आईसक्रीम कारखाने, उद्योग/मनोरंजन मेळावे, प्रदर्शनी, बांधकाम साईटवर पिण्याचे वापराकरिता, सर्व प्रकारचे अनिवासी वापराचे परिसर जेथे पाणी पिण्याकरिता वापरण्यात येते इत्यादिंकरिता जोडपत्र ' अ ' मध्ये दिलेल्या उपविधि ९ दर कलम ९ (ड-२) मधील दरान्वये पाणीपट्टी आकारण्यात येईल. या व्यतिरिक्त महानगरपालिकेने पुरविलेल्या मीटरकरिता प्रचलित दरांवर मीटर भाडे आकारण्यात येईल.

११. उपविधी क्र. ९ (इ).––व्यापारिक २.

मीटरद्वारे पाणी प्राप्त करणारे शुद्ध पाणी बॉटलींग प्लँट, मिनरल वाटर बॉटलींग प्लँट, बर्फ कारखाने, बर्फ क्युब कारखाने, शीतपेय बॉटलींग प्लँट, दारुचे कारखाने, फळांचे रस बॉटलींग प्लॅन्ट, अम्युझमेंट पार्क, वॉटर पार्क, जेथे पाण्याचा वापर उत्पादनाकरीता आवश्यक आहे असे सर्व कारखाने आणि बांधकाम साईटवर बांधकामाकरिता जोडपत्र ' अ ' मध्ये दिलेल्या उपविधि ९ दर कलम ९ (इ) मधील दरान्वये पाणीपट्टी आकारण्यात येईल. या व्यतिरिक्त महानगरपालिकेने पुरविलेल्या मीटरकरिता प्रचलित दरांवर मीटर भाडे आकारण्यात येईल.

१२. उपविधी क्र. ९ (फ).––

नागपूर महानगरपालिका पाणीपुरवठा योजनेतून कामठी कॅन्टोनमेंट तसेच शहर सीमेलगत असलेल्या ग्रामपंचायती, टाऊनशिप, वसाहतीत शुद्धीकरण केलेल्या बल्क पाणीपुरवठ्याला जोडपत्र ' अ ' मध्ये दिलेल्या उपविधी ९ दर कलम ९ (फ) मधील दरान्वये पाणीपट्टी आकारण्यात येईल. मात्र हा पाणीपुरवठा नागपूर महानगरपालिका पाणीपुरवठा योजनेतील पाण्याच्या उपलब्धतेवर अवलंबून राहील.

१३. उपविधी क्र. ५६ (अ).––

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी आणि शासनाचे जलसंपदा विभागाचे क्रमशः विद्युत व कच्चे पाणीपुरवठ्याचे दरात केलेल्या वाढीकरिता पाणीपट्टीचे दर कलम ६ (ब), ६ (ड), ९ (अ), ९ (क-१), ९ (क-२), ९ (ड-१), ९ (ड-२), ९ (इ) आणि ९ (फ) मध्ये नमूद दरांनुसार पाणीपट्टी व्यतिरिक्त प्रती युनिट पाणी वापरावर विद्युत व कच्चे पाणी अधिभार आकारण्यात येईल. हा अधिभार त्रैमासिक कालचक्रानुसार खालीलप्रमाणे निश्चित करण्यात येईल व याकरिता जून २००७ - ऑगस्ट २००७ हो बेस (Base) त्रैमासिक कालचक्र गृहित धरण्यात येईल.

**विद्युत अधिभार** = (बिलींग कालचक्रात विद्युत खर्चानुसार प्रती युनिट पाणीपुरवठ्याकरिता येणारा विद्युत खर्च वजा बेस (Base) त्रैमासिक कालचक्रातील विद्युत खर्चानुसार प्रती युनिट पाणीपुरवठ्याकरिता येणारा विद्युत खर्च).

**कच्चे पाणी अधिभार** = बिलींग कालचक्रात कच्च्या पाण्याच्या प्रती युनिट खर्चानुसार प्रती युनिट पाणीपुरवठ्याकरिता येणारा कच्च्या पाण्याचा खर्च वजा बेस (Base) त्रैमासिक कालचक्रातील कच्च्या पाण्याच्या खर्चानुसार प्रती युनिट पाणीपुरवठ्याकरिता येणारा कच्च्या पाण्याचा खर्च).

१४. उपविधी क्र. ५६ (ब).––

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी आणि शासनाचे जलसंपदा विभागाने क्रमशः विद्युत व कच्चे पाणीपुरवठ्याचे दरात केलेल्या वाढी व्यतिरिक्त इतर भाववाढीमुळे स्लम क्षेत्रात नळ कनेक्शन व नियमिती करणाचे कलम ६ (क) मध्ये नमूद दर, पाणीपट्टीचे दर कलम ९ (अ), ९ (क-१), ९ (क-२), ९ (ड-१), ९ (ड-२), ९ (इ), ९ (ग), ९ (फ) दर कलम १० (ड) व १३ मध्ये नमूद पाणीवापर सुरक्षा अनामत रक्कम, दर कलम २९ (अ) मध्ये नमूद अनधिकृत नळ कनेक्शन नियमितीकरण शुल्क, दर कलम २९ (ब) मध्ये नमूद नळ तोडणी शुल्क व अनधिकृत पाणीवापर शुल्क, दर कलम २९ (क) मध्ये नमूद अनधिकृत नळ कनेक्शन नियमितीकरण शुल्क/नळ तोडणी शुल्क व अनधिकृत पाणीवापर शुल्क आणि दर कलम ३१ (अ), ३१ (ब), ३१ (क), मध्ये नमूद नळ कनेक्शन पुनर्जोडणी शुल्क इत्यादि दरांत व इतर शुल्कात आवश्यकतेनुसार सुधारणा करता येईल व त्याचे अधिकार खालीलप्रमाणे राहतील.–

(i) एका वित्तीय वर्षात वर नमूद दर कलमांसह पाणीपट्टीच्या सर्व वर्गवारींमध्ये पाच टक्के पर्यंत दरवाढ करण्याचे अधिकार आयुक्त, महानगरपालिका, नागपूर यांना राहतील मात्र स्थायी समितीकडे ही बाब माहितीकरिता पाठविणे अनिवार्य राहील,

(ii) एका वित्तीय वर्षात पाच टक्के पेक्षा जास्त दरवाढ करण्याचे अधिकार महानगरपालिका सभेला राहतील.

पाणीपट्टी उपविधीचे

जोडपत्र ' अ '

### उपविधी-६

दर कलम ६ (ब).––

| जोडणीची वर्गवारी/आकार | १५ मि. मि. (रुपये) | अधिभाराकरिता दरमहा पाणीमात्रा (युनिट) | २० मि. मि. (रुपये) | अधिभाराकरिता दरमहा पाणीमात्रा (युनिट) | २५ मि. मि. (रुपये) | अधिभाराकरिता दरमहा पाणीमात्रा (युनिट) |
|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) |
| निवासी | १५० | ३० | २५० | ४५ | ४०० | ६० |
| संस्थेकरिता | १,२०० | ८० | २,००० | १३० | ३,००० | १८० |
| व्यापारिक-१ व २ | ३,००० | ७० | ५,००० | १०० | ८,००० | १४० |

टीप :–– वरील उपविधित मोडणाऱ्या सर्व उपभोक्त्यांनी नवीन मीटर बसविण्याची संपूर्ण प्रक्रिया हे अधिनियम मंजूर झाल्याच्या तारखेपासून एक वर्षाच्या आत पूर्ण करावी, अन्यथा या मुदतीनंतर वर दर्शविण्यात आलेल्या राशींच्या तीनपट दर आकारण्यात येईल.

दर कलम ६ (क).––

| घराचा प्रकार | नळ जोडणी/नियमितीकरण शुल्क रुपये |
|---|---|
| (१) | (२) |
| झोपड्या (काँक्रीटचे छत नसलेले घर) | ५००.०० |
| ५०० वर्गफूट पर्यंत पक्के बांधकाम असलेले घर | ६००.०० |

दर कलम ६ (ड).––

| घराचा प्रकार | दरमहा पाणीपट्टी रुपये | पाणी पुरवठ्याची अधिकतम मात्रा (युनिट) |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| झोपड्या (काँक्रीटे छत नसलेले घर) | ३०.०० | १० |
| ५०० वर्गफूट पर्यंत पक्के बांधकाम असलेले घर | ५०.०० | १२ |

टीप :–– १. वरील उपविधित मोडणाऱ्या व विनामीटर अधिकृतरित्या पाणीपुरवठा प्राप्त करणाऱ्या उपभोक्त्यांच्या नळजोडणींवर म.न.पा. द्वारे मीटर लावेपर्यंत वरील दरांनुसार पाणीपट्टी आकारण्यात येईल. मात्र अश्याप्रकारच्या सर्व उपभोक्त्यांच्या नळजोडणीवर म.न.पा. द्वारे मीटर लावल्यानंतर मासिक अधिकतम मात्रेपेक्षा जास्त निवासी पाणीवापराकरिता दर कलम ९ (अ) प्रमाणे पाणीपट्टी आकारण्यात येईल.

## उपविधी - ९

दर कलम ९ (अ).––निवासी

नळजोडणीनिहाय दरमहा पाणीवापराकरीता प्रती नळजोडणी दरमहा देयक राशी खालीलप्रमाणे राहील.––

| अ. क्र. | नळजोडणीचा आकार (मि. मि.) | १५ | २० | २५ | ४० | ५० | ८० | १०० | १५० | २०० | २५० | ३०० |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) | (१२) | (१३) |
| १ | दरमहा पाणीवापर | १० युनिट पर्यंत | २० युनिट पर्यंत | ३० युनिट पर्यंत | ६० युनिट पर्यंत | ८५ युनिट पर्यंत | १५० युनिट पर्यंत | २१५ युनिट पर्यंत | ४२५ युनिट पर्यंत | ७२५ युनिट पर्यंत | १११० युनिट पर्यंत | १५८० युनिट पर्यंत |
| २ | प्रती नळजोडणी दरमहा देयक राशी. | ५० | १०० | १८० | ५१० | ८०५ | १७८० | २७५५ | ५९०५ | १०४०५ | १६१८० | २३२३० |

नळजोडणीनिहाय वर नमूद दरमहा पाणीवापरापेक्षा जास्त पाणीवापराकरिता खालील नमूद दराने पाणीपट्टी आकारण्यात येईल.

| बिलींग स्लॅब | प्रती युनिट दर रुपये |
|---|---|
| (१) | (२) |
| १ ते २० युनिट | ५.०० |
| २१ ते ३० युनिटपर्यंत | ८.०० |
| ३१ ते ८० युनिटपर्यंत | ११.०० |
| ८० युनिटनंतर | १५.०० |

टीप :–– १. सहवापराकरिता नळ कनेक्शन असलेल्या वसाहती व सहनिवासी इमारतीतील दरमहा एकूण पाणी वापरास प्रती एकक/गाळा निहाय विभागून पाणीपट्टी आकारण्यात येईल आणि अशा प्रत्येक गाळ्याचा प्रती नळजोडणी दरमहा पाणीवापर १० युनीट पेक्षा कमी असल्यास प्रती नळजोडणी प्रती गाळा दरमहा देयक राशी रु. ५० प्रमाणे आकारण्यात येईल.

२. या उपविधित मोडणाऱ्या निवासीसह अनिवासी वापर असलेल्या फ्लॅटस्कीम मधील व इतर निवासी इमारतीतील अनिवासी गाळ्यांना दोन वर्गात विभागण्यात येईल.

(i) फ्लॅटस्कीम मधील व इतर निवासी इमारतीतील असे अनिवासी गाळे जेथे पाण्याचा वापर व्यवसायाकरिता होत नाही.

(ii) फ्लॅटस्कीम मधील व इतर निवासी इमारतीतील असे अनिवासी गाळे जेथे पाण्याचा वापर व्यवसायाकरिता होतो.

वरील (i) प्रमाणे अनिवासी गाळे असलेल्या सहनिवासी इमारतीतील नळजोडणीनिहाय पाणीवापराला त्या इमारतीतील रहिवासी गाळ्यात विभागून उपविधि ९-अ प्रमाणे पाणीपट्टी आकारण्यात यावी. मात्र प्रत्येक अनिवासी गाळ्याला दरमहा रु. १०० प्रती गाळा प्रमाणे अतिरिक्त पाणीपट्टी आकारण्यात येईल.

मिश्र पाणीवापर असलेल्या सहनिवासी वसाहती व इमारतीत (फ्लॅट स्किम) तसेच इतर निवासी इमारतीत वरील (ii) प्रमाणे अनिवासी पाणी वापराकरीता संबंधित गाळे धारकास वेगळे नळ घेण्याचे कळविण्यात येईल व अशा वेगळ्या नळ जोडणीचे देयक संबंधित उपविधिनुसार देण्यात येईल.

**दर कलम ९ (ब)**—अर्धनिवासी : रद्द करण्यात आले.

**दर कलम ९ (क-१)**—संस्था-अ

नळजोडणीनिहाय दरमहा पाणीवापराकरिता प्रती नळजोडणी दरमहा देयक राशी खालीलप्रमाणे राहील.—

| अ. क्र. | नळजोडणीचा आकार (मि. मि.) | १५ | २० | २५ | ४० | ५० | ८० | १०० | १५० | २०० | २५० | ३०० |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) | (१२) | (१३) |
| १ | दरमहा पाणीवापर | १० युनिट पर्यंत | २० युनिट पर्यंत | ३० युनिट पर्यंत | ६० युनिट पर्यंत | ८५ युनिट पर्यंत | १५० युनिट पर्यंत | २१५ युनिट पर्यंत | ४२५ युनिट पर्यंत | ७२५ युनिट पर्यंत | १११० युनिट पर्यंत | १५८० युनिट पर्यंत |
| २ | प्रती नळजोडणी दरमहा देयक राशी. | १३० | २६० | ४१० | ८६० | १२५० | २४२० | ३५९० | ७३७० | १२७७० | १९७०० | २८१६० |

नळजोडणीनिहाय वर नमूद दरमहा पाणीवापरापेक्षा जास्त पाणीवापराकरिता खाली नमूद दराने पाणीपट्टी आकारण्यात येईल.—

| बिलींग स्लॅब | प्रती युनिट दर रुपये |
|---|---|
| (१) | (२) |
| १ ते २० युनिट | १३.०० |
| २१ ते ८० युनिटपर्यंत | १५.०० |
| ८० युनिटनंतर | १८.०० |

**दर कलम ९ (क-२)**—संस्था-ब

नळजोडणीनिहाय दरमहा पाणीवापराकरिता प्रती नळजोडणी दरमहा देयक राशी खालीलप्रमाणे राहील.—

| अ. क्र. | नळजोडणीचा आकार (मि. मि.) | १५ | २० | २५ | ४० | ५० | ८० | १०० | १५० | २०० | २५० | ३०० |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) | (१२) | (१३) |
| १ | दरमहा पाणीवापर | १० युनिट पर्यंत | २० युनिट पर्यंत | ३० युनिट पर्यंत | ६० युनिट पर्यंत | ८५ युनिट पर्यंत | १५० युनिट पर्यंत | २१५ युनिट पर्यंत | ४२५ युनिट पर्यंत | ७२५ युनिट पर्यंत | १११० युनिट पर्यंत | १५८० युनिट पर्यंत |
| २ | प्रती नळजोडणी दरमहा. देयक राशी. | १५० | ३०० | ४७० | ९८० | १४२० | २७२० | ४०२० | ८२२० | १४२२० | २१९२० | ३१३२० |

नळजोडणीनिहाय वर नमूद दरमहा पाणीवापरापेक्षा जास्त पाणीवापराकरिता खाली नमूद दराने पाणीपट्टी आकारण्यात येईल.—

| बिलींग स्लॅब | प्रती युनिट दर रुपये |
|---|---|
| (१) | (२) |
| १ ते २० युनिट | १५.०० |
| २१ ते ८० युनिटपर्यंत | १७.०० |
| ८० युनिटनंतर | २०.०० |

ना.–एक-अ-८९ (११५०).

**दर कलम ९ (ड-१)–व्यापारिक १-अ**

नळजोडणीनिहाय दरमहा पाणीवापराकरिता प्रती नळजोडणी दरमहा देयक राशी खालीप्रमाणे राहील.–

| अ. क्र. | नळजोडणीचा आकार (मि. मि.) | १५ | २० | २५ | ४० | ५० | ८० | १०० | १५० | २०० | २५० | ३०० |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) | (१२) | (१३) |
| १ | दरमहा पाणीवापर | १० युनिट पर्यंत | २० युनिट पर्यंत | ३० युनिट पर्यंत | ६० युनिट पर्यंत | ८५ युनिट पर्यंत | १५० युनिट पर्यंत | २१५ युनिट पर्यंत | ४२५ युनिट पर्यंत | ७२५ युनिट पर्यंत | १११० युनिट पर्यंत | १५८० युनिट पर्यंत |
| २ | प्रती नळजोडणी दरमहा देयक राशी. | २५० | ५०० | ८५० | १९०० | २८२५ | ५७५० | ८६७५ | १८१२५ | ३१६२५ | ४८९५० | ७०१०० |

नळजोडणीनिहाय वर नमूद दरमहा पाणीवापरापेक्षा जास्त पाणीवापराकरिता खाली नमूद दराने पाणीपट्टी आकारण्यात येईल.–

| बिलींग स्लॅब | प्रती युनिट दर रुपये |
|---|---|
| (१) | (२) |
| १ ते २० युनिट | २५.०० |
| २१ ते ८० युनिटपर्यंत | ३५.०० |
| ८० युनिटनंतर | ४५.०० |

**दर कलम ९ (ड-२)–व्यापारिक १-ब**

नळजोडणीनिहाय दरमहा पाणीवापराकरिता प्रती नळजोडणी दरमहा देयक राशी खालीप्रमाणे राहील.–

| अ. क्र. | नळजोडणीचा आकार (मि. मि.) | १५ | २० | २५ | ४० | ५० | ८० | १०० | १५० | २०० | २५० | ३०० |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) | (१२) | (१३) |
| १ | दरमहा पाणीवापर | १० युनिट पर्यंत | २० युनिट पर्यंत | ३० युनिट पर्यंत | ६० युनिट पर्यंत | ८५ युनिट पर्यंत | १५० युनिट पर्यंत | २१५ युनिट पर्यंत | ४२५ युनिट पर्यंत | ७२५ युनिट पर्यंत | १११० युनिट पर्यंत | १५८० युनिट पर्यंत |
| २ | प्रती नळजोडणी दरमहा देयक राशी. | २५० | ५०० | १००० | २५०० | ३८७५ | ८७५० | १३६२५ | २९३७५ | ५१८७५ | ८०७५० | १,१६,००० |

नळजोडणीनिहाय वर नमूद दरमहा पाणीवापरापेक्षा जास्त पाणीवापराकरिता खालील नमूद दराने पाणीपट्टी आकारण्यात येईल.–

| बिलींग स्लॅब | प्रती युनिट दर रुपये |
|---|---|
| (१) | (२) |
| १ ते २० युनिट | २५.०० |
| २१ ते ८० युनिटपर्यंत | ५०.०० |
| ८० युनिटनंतर | ७५.०० |

**दर कलम ९ (इ)–व्यापारिक २**

नळजोडणीनिहाय दरमहा पाणीवापराकरिता प्रती नळजोडणी दरमहा देयक राशी खालील प्रमाणे राहील.–

| अ. क्र. | नळजोडणीचा आकार (मि. मि.) | १५ | २० | २५ | ४० | ५० | ८० | १०० | १५० | २०० | २५० | ३०० |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) | (१२) | (१३) |
| १ | दरमहा पाणीवापर | १० युनिट पर्यंत | २० युनिट पर्यंत | ३० युनिट पर्यंत | ६० युनिट पर्यंत | ८५ युनिट पर्यंत | १५० युनिट पर्यंत | २१५ युनिट पर्यंत | ४२५ युनिट पर्यंत | ७२५ युनिट पर्यंत | १११० युनिट पर्यंत | १५८० युनिट पर्यंत |
| २ | प्रती नळजोडणी दरमहा देयक राशी. | ६०० | १२०० | १८०० | ७२०० | ११७०० | ४१४०० | ७६५०० | १,८९,९०० | ३,५१,९०० | ५,५९,८०० | ८,१३,६०० |

नळजोडणीनिहाय वर नमूद दरमहा पाणीवापरापेक्षा जास्त पाणीवापराकरिता खालील नमूद दराने पाणीपट्टी आकारण्यात येईल.–

| बिलींग स्लॅब | प्रती युनिट दर रुपये |
|---|---|
| (१) | (२) |
| १ ते ३० युनिट | ६०.०० |
| ३१ ते १०० युनिटपर्यंत | १८०.०० |
| १०० युनिटनंतर | ५४०.०० |

दर कलम ९ (फ)——

नागपूर महानगरपालिका शहर सीमेलगत शुद्धीकरण केलेल्या बल्क पाणीपुरवठ्याचे दर खालीलप्रमाणे राहतील.–

(i) नागपूर महानगरपालिका शहर पाणीपुरवठा प्रणालीतून शुद्ध पाणीपुरवठ्याचे बल्क दर रुपये १६.०० प्रती युनिट.

(ii) शुद्ध पाणीपुरवठा पंपिंग स्टेशन किंवा पंपिंग मेन वरुन शुद्ध पाणीपुरवठ्याचे बल्क दर रुपये १०.०० प्रती युनिट.

दर कलम १० (ड)——

स्लम क्षेत्रातील झोपड्या (काँक्रीटचे छत नसलेले घर) व ५०० वर्गफूट पर्यंत पक्के बांधकाम असलेले घरातील नळजोडणीकरिता ' पाणीवापर सुरक्षा अनामत रक्कम '.

| घराचा प्रकार | प्रती नळजोडणी शुल्क |
|---|---|
| (१) | (२) |
| | रुपये |
| झोपड्या (काँक्रीटचे छत नसलेले घर) .. | १५०.०० |
| ५०० वर्गफूट पर्यंत पक्के बांधकाम असलेले घर .. | २५०.०० |

**टीप** :—–वरील सुरक्षा अनामत रक्कम ५० रुपये प्रती महिना प्रमाणे टप्प्यात पाणीपट्टीचे देयकांतून वसूल करण्यात येईल.

स्लम क्षेत्रातील ५०० वर्गफूट पेक्षा जास्त पक्के बांधकाम असलेले घर आणि स्लम क्षेत्राव्यतिरिक्त इतर क्षेत्रातील नळजोडणीकरिता ' पाणीवापर सुरक्षा अनामत रक्कम '.

| नळजोडणीचा आकार | उपविधि ६(ब) आणि ९(अ) मधिल घरगुती वर्गवारीच्या नळ जोडणीकरिता | इतर वर्गवारी आणि उपविधि ६(ब) ९(क-१, क-२) (ड-१, ड-२), ९(इ), ९(ग) आणि ९(फ) च्या वर्गवारीतील नळ जोडणीकरिता |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| | रुपये | रुपये |
| १५ मि. मि. | ६०० | ५,००० |
| २० मि. मि. | १२,०० | ७,५०० |
| २५ मि. मि. | १,८०० | १२,००० |
| ४० मि. मि. | ३,६०० | १५,००० |
| ५० मि. मि. | ६,००० | ३०,००० |
| ८० मि. मि. | १३,००० | ४०,००० |
| १०० मि. मि. | २५,००० | ७०,००० |
| १५० मि. मि. | ५४,००० | १,५०,००० |
| २०० मि. मि. | ९०,००० | २,५०,००० |
| २५० मि. मि. | १,००,००० | ३,००,००० |
| ३०० मि. मि. | १,५०,००० | ५,००,००० |

मात्र सहवापराकरिता नळकनेक्शन असलेल्या वसाहती व सहनिवासी इमारतीतील अस्तित्वात असलेल्या नळजोडणीचा आकार व संस्थेचा विचार न करता रुपये ६०० प्रती निवासी गाळा प्रमाणे एकूण गाळ्यांकरिता ' पाणीवापर सुरक्षा अनामत रक्कम ' आकारण्यात येईल.

राज्य शासनाचे राज्यपाल यांचे आदेश व नावाने,

**का. तु. सालकर,**
उप सचिव.